अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

# NOTICE

नो.क्र. 73

दि. ०५/०८/२०२१

## वरीष्ठ महाविद्यालय

## प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

एफ.वाय.बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी./ बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स/ बी.बी.ए./ बी.बी.ए (सी.ए.) /बी.व्होक (फुड प्रोसेसिंग, जर्नालिझम, डेअरी टेक्नॉलॉजी, रिटेल मॅनेजमेंट, ई.कॉमर्स, बी.लिब सायन्स इ.)

शैक्षणिक वर्ष **२०२१–२२** साठी प्रवेश प्रक्रिया दि. **०६/०८/२०२१** पासून ऑनलाईन पध्दतीने व खालील नियमांनुसार सुरू होत आहे. यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व संबंधित नोटीसेस काळजीपूर्वक वाचावेत. जेणेकरून प्रवेश घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश कसा घ्यावा यासाठी या नोटीस सोबतचा चार्ट अगोदर अवश्य वाचावा नी काळजीपूर्वक ऑनलाईन फॉर्म भरावा.

**आपल्याच महाविद्यालयातून मार्च/एप्रिल २०२१ मधील परीक्षेत इ. १२ वी मध्ये प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. ०६/०८/२०२१ ते दि. १३/०८/२०२१ पर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा. अन्यथा त्याचा या महाविद्यालयातील प्रवेशावरील हक्क संपुष्टात येईल. याची नोंद घ्यावी.**

इ. १२वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी **दि.०६/०८/२०२१** ते **१३/०८/२०२१** या कालावधील महाविद्यालयाच्या www.tccollege.org या संकेतस्थळावर जाऊन आपला प्रवेश दिलेल्या मुदतीत निश्चित करावा.

### थेट प्रवेश प्रक्रिया सुरू असलेले अभ्यासक्रम

१. **एफ.वाय.बी.ए.** – इ. १२ वी कला मध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध कोटयानुसार अनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहे.

२. **एफ.वाय.बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स.** – सदर कोर्स हा विनाअनुदानित तत्वावर आहे. इ. १२ वी सायन्सने बोर्डाच्या परीक्षेत किमान ७० टक्केच्या गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेने प्रवेश मिळेल. **(यासाठी १२वी सायन्समध्ये मॅथ्स् विषय असणे आवश्यक आहे)**

३. **जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन / रिटेल मॅनेजमेंट / ई–कॉमर्स ॲण्ड डिजिटल मार्केटिंग (बी.व्होक.)** – इ. १२ वी मध्ये किमान ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

## प्रतिक्षा यादीनुसार प्रवेश प्रक्रिया सुरू असलेले अभ्यासक्रम
## एफ.वाय.बी.एस्सी. / एफ.वाय.बी.कॉम. / एफ.वाय.बी.बी.ए. / एफ.वाय.बी.बी.ए. (सी.ए.) / (बी.व्होक) फुड प्रोसेसिंग व हार्वेस्ट टेक्नॉलॉजी / डेअरी टेक्नॉलॉजी

या वर्गात प्रवेश इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या (www.tccollege.org) संकेत स्थळावरून ऑनलाईन माहिती पत्रक डाउनलोड करावे व महाविद्यालयाच्या या संकेत स्थळावर प्रतिक्षा यादीसाठी स्वतंत्रपणे अर्ज भरावा. सदर प्रतिक्षा यादीचे ऑनलाईन फॉर्म दि. ०६/०८/२०२१ ते १३/०८/२०२१ रोजी **सायंकाळी ०५.००** वाजेपर्यंत भरावेत. प्रतिक्षा अर्जाचा नंबर स्वत:जवळ लिहून ठेवावा. सदर नंबरचा उपयोग प्रवेश घेतेवळी अर्ज डाउनलोड करताना वापरावयाचा आहे. **विद्यार्थ्यांनी प्रतिक्षा अर्जाची प्रिंट महाविद्यालयात जमा करू नये.** दि. १६/०८/२०२१ रोजी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जात संवर्गाप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल. या यादीनुसार प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दि. २१/०८/२०२१ पर्यंत प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण करून व ऑनलाईन फी भरून आपला प्रवेश निश्चित करावा.

प्रवेश फी भरून प्रवेश निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज डाउनलोड करावा. हया डाउनलोड फॉर्म सोबत इ. १२वी ची गुणपत्रिका, एल.सी., जातीचा दाखला, फी भरल्याचे चलन, आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बॅंकेचे पासबूक झेरॉक्स, डोमासाईल इ. कागदपत्रे स्कॅन करून महाविद्यालयाच्या tcc.admission20@gmail.com ईमेल आयडीवर पाठवावेत. पुढे प्रत्यक्ष कॉलेज सुरू झाल्यानंतर अपलोड केलेल्या प्रवेश अर्जासोबतची सर्व कागदपत्रे प्रशासन भवन येथे जमा करावेत.(या काळात प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशावरील आपला हक्क संपूष्टात येईल याची नोंद घ्यावी.)

शैक्षणिक वर्ष **२०२१–२२** मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बी.बी.ए./बी.बी.ए.(सी.ए.)/ बी. एस्सी. / बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स /बी.व्होकचे सर्व अभ्यासक्रमांची फी यावर्षी कोवीड १९ च्या असाधारण परिस्थितीमध्ये फी दोन टप्प्यात सवलतीत भरण्यासाठी दोन इस्टॉलमेंटस आता दिलेली आहेत त्यानुसार प्रवेश घेताना फीचा पहिला सवलतीचा हप्ता भरावा व उर्वरित ५० टक्के फी पुढील दोन महिन्यात भरावी.

### – प्रवेश अर्जासोबतजोडावयाची कागदपत्रे –

१. इ. १२ वी शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या ऑनलाईन किंवा २ झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.
२. इ. १२ वीचे Online गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत
३. ई.बी.सी. /जात संवर्गाची फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर शासनाने दिलेल्या मुदतीत ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. पी.टी.एफ./एस.टी.एफ. फी सवलतीचा संपूर्ण भरलेले सही शिक्क्या निशी अर्ज प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे. (फक्त अनुदानित वर्गासाठी)
५. मागासर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत
६. विद्यार्थ्यांचे आधार कार्डची झेरॉक्स
७. अलिकडच्या काळात काढलेला आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो

**सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्याच्या शाळा सोडल्याच्या किमान १५ झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वत:च्या ई–मेल आय.डी. व वापरातील मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.**

प्रबंधक

चेअरमन
प्रवेश प्रक्रिया

प्राचार्य